विद्या विकास मंडळ

रामकृष्ण महादेव साळगावकर उच्च माध्यमिक विद्यालय

मडगाव -गोवा

पहिली सत्र परीक्षा ऑगस्ट - २०२३

इयत्ता - बारावी गुण -२०

दिनांक - १२/०८/२०२३ विषय - मराठी ( द्वितीय भाषा) वेळ - १ तास

---

सूचना : १. शुध्दलेखनाचे नवीन नियम पाळावेत.

२. उजवीकडील अंक प्रश्नाचे गुण दर्शवितात.

---

विभाग १ - व्याकरण

खालील शब्दांची भाववाचक नामे लिहा.

प्रश्न १. मानव ०१

प्रश्न २. कणखर ०१

खालील वाक्यातील अधोरेखित शब्दांच्या जाती लिहा.

प्रश्न ३. शिकारचोरांकडून गेंडयाची शिकार अजूनही होते. ०२

विभाग २ - गद्य आणि पद्य

खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.

प्रश्न ४. सागराने भारतमातेला कोणते वचन दिले? ०१

प्रश्न ५ कवी बा. भ. बोरकरांनी कोणत्या हातांना देखणे म्हटलेले आहे? ०१

खालील कवितेच्या ओळी कंसातील योग्य शब्द वापरुन पूर्ण करा.

प्रश्न ६. वत्स न देखता गाई ______ । झाले मजप्रती तैसे आता ॥ ०१

(तळमळती, हुंबरती, ओरडती)

प्रश्न ७. प्रासाद इथे भव्य परी मज भारी आईची झोपडी ______. ०१

(न्यारी, सारी, प्यारी )

प्रश्न ८. तेच ______ देखणे , जे कोंडिती सात्या नभा। ०१

(ओठ, हात, डोळे )

खालील वाक्याचे संदर्भासह स्पष्टीकरण लिहा.

प्रश्न ९. " अन्न आलच नाही .मग जाणार कुठे?" ०५

या

" निसर्ग हा सर्वात मोठा गुरु आहे. "

विभाग ३ - लेखन

खाली दिलेल्या वाक्प्रचाराचा योग्य पर्याय निवडून लिहा.

प्रश्न १०.' पोटात शिरणे ' या वाक्प्रचाराचा अर्थ काय ? ०१

१. गोंधळून जाणे

२. खूप भूक लागणे

३. वश करून घेणे

४. मिळून मिसळून राहणे

प्रश्न ११. ' बार टाकणे ' म्हणजे काय ? ०१

१. . हल्ला करणे

२. गोळी घालणे

३. शोध घेणे

४. बाजुला सारणे

खालील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नाची योग्य उत्तरे लिहा.

जोतीराव फुले जे एवढया मोठ्या योग्यतेस चढले त्याचे बरेच मोठे श्रेय त्याच्या सुपत्नीस दिले पाहिजे.राग म्हणून काय चीज आहे ती या बाईच्या गावीच नव्हती.ती नेहमी हसतमुख असे.तिचे हसू गालावर तेवढे दिसून येईल इतकेच मर्यादित असे.सावित्रीबाईला सर्व लोक 'काकू' म्हणत असत.पाहुणेमंडळी घरी आली म्हणजे तिला मोठा आनंद वाटत असे व त्याच्याकरिता ती मोठ्या आवडीने गोड जेवण तयार करीत असे. ती फार ममताळू आणि दयाळू होती.तिने जन्मास आल्यावर विद्यादानाचे काम तर केलेच,परंतु तितकेच तिने अन्नदानही केले. तात्यांना भेटण्यास आलेल्या मंडळीस आग्रहाने जेवावयास लावणे हे जणू तिचे काम होते.

प्रा. ना. ग. पवार

प्रश्न १२. जोतीराव फुले यांच्या यशाचे श्रेय कोणाला दिले आहे? ०१

प्रश्न १३. सावित्रीबाईचा स्वभाव कसा होते? ०१

प्रश्न १४. तात्यांना भेटावयास आलेल्या मंडळीस सावित्रीबाई काय करायला लावायच्या? ०१

प्रश्न १५ उताऱ्याला योग्य शीर्षक द्या. ०१

||||||||||||||||||||||||||||||||||||||||